आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी, उमेदवारी अर्ज भरायला आजपासून प्रारंभ

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतराच्या हालचालींना जोर

- राष्ट्रीय जल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान, महाराष्ट्राला पाच पुरस्कार

- २०२६मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधून हॉकी, क्रिकेट, बॅडमिंटन, कुस्तीसह अनेक खेळ वगळले

**आणि**

- ‘दाना’ चक्रीवादळ येत्या गुरुवारी मध्यरात्री ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर धडकण्याचा हवामान विभागाचा अंदाज.

**<><><><><>**

एकाच टप्प्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज प्रसिद्ध झाली असून राज्यातल्या सर्व २८८ मतदारसंघांमधे एकाच टप्प्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज आजपासून भरता येतील. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २०नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची अधिसूचनाही जारी झाली आहे. काँग्रेस खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली आहे. पोटनिवडणुकीसाठीचं मतदानही २० नोव्हेंबरला होणार असून मतमोजणी २३ नोव्हेंबरला होईल.

<><><><><>

महाविकास आघाडीत आता अवघ्या काही जागांबाबत सहमती व्हायची आहे. उर्वरित जागांवर सहमती झाल्याचं काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं म्हटलंय. उर्वरित जागांविषयी चर्चा करण्यासाठी दुपारी साडे ३ वाजता पुन्हा बैठक होणार असल्याचं काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यावर ते बोलत होते. काँग्रेसची पहिली यादी लवकरच जाहीर होईल, असंही ते म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची पहिली यादी आज अंतिम होईल, अशी माहिती खासदार अनिल देसाई यांनी यावेळी दिली. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी आज राजापूर मतदारसंघासाठी एबी फॉर्म दिल्याची माहिती विद्यमान आमदार राजन साळवी यांनी दिली.

<><><><><>

भाजपाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी आज भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षात प्रवेश केला. वाशी इथं पक्षाच्या निर्धार मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं. संदीप नाईक यांचे वडील गणेश नाईक यांना ऐरोली मतदारसंघातून भाजपाने उमेदवारी जाहीर केली आहे. संदीप नाईक बेलापूर मतदारसंघातून निवडणूक

लढवण्यास इच्छुक होते. मात्र, भाजपाने त्यांना उमेदवारी नाकारल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षात प्रवेश केल्याचं सांगितलं जात आहे.

<><><><>

भाजपा नेते आणि माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. महायुतीचं जागावाटप लवकरच जाहीर होईल आणि त्याची घोषणा होईल, असं ते म्हणाले. आमच्या पक्षाकडे पुरेशा जागा आहेत, त्यामुळं पक्ष सोडून जाणाऱ्यांविषयी चिंता नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.
या यादीत उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार नितीन पाटील, सयाजी शिंदे, आमदार अमोल मिटकरी यांचा समावेश आहे.

<><><><>

भाजपचे नेते, माजी खासदार निलेश राणे उद्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळमध्ये होणाऱ्या जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश होईल अशी माहिती नितेश राणे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. हे सगळं पक्षीय धोरण असल्याचं सांगून महायुतीच्या

फार्म्युल्यानुसार पक्षप्रवेश करत असल्याचं राणे म्हणाले. भारतीय जनता पक्षासोबत आपले नेहमीच चांगले संबंध राहणार असल्याचही त्यांनी स्पष्ट केल.

<><><><><>

निवडणूक आयोगानं काल रात्री पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर खेड-शिवापूर टोल नाक्याजवळ एका गाडीतून ५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. या गाडीची नोंदणी सांगोला जिल्ह्यातल्या एका व्यक्तीच्या नावावर असून, या प्रकरणी पुढला तपास सुरु आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात ३८ जागांसाठी मतदान होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल आणि १ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

झारखंडमधे पहिल्या टप्प्यातलं मतदान येत्या १३ नोव्हेंबरला होणार असून, या टप्प्यासाठी आतापर्यंत २५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात विविध ठिकाणी राबवण्यात येत असलेल्या

कारवाईअंतर्गत सात कोटी ७२ लाख रुपये किंमतीचं बेकायदेशीर साहित्य आणि रोख रक्कम हस्तगत करण्यात आली, तर आचार संहिता भंगाच्या सहा तक्रारी दाखल झाल्या आहेत. दरम्यान राज्याच्या ग्रामीण भागात मतदानाची वेळ कमी करण्यात आल्याचा झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते सुप्रियो भट्टाचार्य यांचा आरोप निवडणूक आयोगानं फेटाळला आहे. नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या फक्त ९८१केंद्रांवर मतदानाची वेळ सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. इतर ठिकाणी मतदानाची वेळ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असणार आहे. अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी दिली.

**<><><><><>**

सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशनमुळे ग्रामीण भागात राहणाऱ्यांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दिली. जलशक्ती मंत्रालयातर्फे दिल्या जाणाऱ्या पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या पुरस्कारांसाठी सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, शाळा किंवा महाविद्यालय, उद्योग, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ती संघटना, संस्था आणि नागरी संस्था अशा ९ श्रेणींमध्ये ३८ विजेते निवडण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्याच्या गटात ओडिशानं पहिला, उत्तर प्रदेशने दुसरा तर गुजरात आणि पुद्दुचेरीने संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकावला. महाराष्ट्रालाही पाच जलपुरस्कार मिळाले आहेत. यात सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या श्रेणीत पुणे महानगर पालिकेला पुरस्कार मिळाला आहे. विविध श्रेणीत मिळून महाराष्ट्राला ५ पुरस्कार मिळाले.

**<><><><><>**

आगामी राष्ट्रकूल स्पर्धांमधून हॉकी, क्रिकेट, कुस्ती, बॅडमिंटन, स्क्वॅश आणि टेबल टेनिस सह अनेक खेळ वगळण्यात आले आहेत. यातल्या बहुतांश खेळांमध्ये भारताची पदकं निश्चित असतात. स्कॉटलंडमधल्या ग्लासगो शहरात २०२६ मध्ये होणाऱ्या या स्पर्धांमध्ये केवळ १० खेळांचा समावेश असणार आहे. त्यात ॲथलेटिक्स, जलतरण, आर्टिस्टिक जिम्नस्टॅिक, सायकलिंग, नेट बॉल, भारोत्तोलन, मुष्टीयुद्ध, ज्युदो, बाऊल्स, बास्केटबॉल यांचा समावेश आहे. यातल्या काही खेळांमध्ये दिव्यांग खेळाडूही सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेलं ‘दाना’ चक्रीवादळ ओदिशा किनारपट्टीच्या दिशेनं पुढे सरकत आहे. हे वादळ येत्या गुरुवार आणि शुक्रवार दरम्यानच्या मध्यरात्री ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर तीव्र चक्रीवादळाच्या स्वरूपात धडकेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

ओदिशा किनारपट्टीवरच्या भितरकणिका आणि धामरा दरम्यान हे वादळ धडक देईल, असा अंदाज हवामानाच्या अनेक मॉडेल्सनं वर्तवला आहे. त्यामुळे या भागातल्या सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे.

वादळाच्या प्रभावामुळे उद्यापासून या भागात पाऊस जोर पकडणार असून, हवामान विभागानं मयूरभंज, कटक, जाजपूर, बालासोर, भद्रक, केंद्रपारा, खोरधा, केओंझार, पुरी आणि जगतसिंगपूर या भागाला येत्या गुरुवारी पावसाचा आणि पुराचा रेड अलर्ट जारी केला आहे. ओदिशाच्या किनारपट्टी भागात एनडीआरएफ नं आपत्कालीन प्रतिसादासाठी आपल्या ११ तुकड्या तैनात केल्या असून, भारतीय लष्कर, नौदल आणि तटरक्षक दल देखील बचाव कार्यासाठी सज्ज आहे.

चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ओदिशा सरकारनं किनारपट्टी भागातल्या आणि लगतच्या १४जिल्ह्यांमधल्या सर्व शाळा उद्यापासून तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा ओदिशा राज्याचा तीन दिवसांचा पूर्वनियोजित दौरा पुढे ढकलण्यात आला आहे.

<><><><><>

पूर्वीच्या सार्स किंवा एमईआरएस या आजारांपेक्षा कोविड – १९ जास्त संसर्गजन्य का ठरला याचं उत्तर जपानी शास्त्रज्ञांनी शोधून काढलं आहे. यासंदर्भात जपानमधल्या कोबे विद्यापीठाने केलेल्या संशोधनात आढळलं, की कोविड – १९ च्या विषाणूमधले विकर रुग्णाच्या शरीरातल्या रोगप्रतिकारक पेशींना एकत्र येण्यापासून रोखतात. त्यामुळे त्यांचा संसर्ग अधिक लौकर होतो.

//<><><><><>//